नि.दि.दा.क्र.१८७/२०१९
बालाजी वि. भारती व अन्य
**नि.क्र. २३ च्या पुढे**

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १**
नावः– बालाजी सदाशिवराव गोणे,
वयः– ४९ वर्षे, व्यवसायः– शिक्षक,
राहणारः– विकास नगर, उदगीर.
(निशाणी क्रमांक ४० वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात आली.)

**<u>प्रतिवादी क्रमांक २ तर्फे शपथेवर उलटतपास विधिज्ञ श्री.एल. एस. मध्वरे यांच्यामार्फत सुरू</u>**

४. वादग्रस्त प्लॉट च्या आसपास वस्ती म्हणजेच ईमारती आहेत. वादग्रस्त प्लॉटवर जाण्यासाठी चारही बाजुने रस्ते आहेत. मी ज्यांच्या कडुन प्लॉट विकत घेतला त्यांचे कागदपत्र तसेच जागा पाहिली होती. वादग्रस्त प्लॉट चा मंजुर ले– ऑऊट प्लॅन मी पाहिला नाही. सदरील प्लॉट अकृषीक कधी झाला हे मला सांगता येणार नाही. मी सदरील प्लॉट चा ७/१२ देखील पाहिला नाही. खरेदीखताच्या वेळी ले–आऊट प्लॅन, अकृषीक परवाना व ७/१२ जोडले होते किंवा कसे मला आठवत नाही.

५. वादग्रस्त प्लॉटचा सर्वे क्रमांक ६/१ आहे. सदरील प्लॉट उदगीर नगर परीषद हद्दीमध्ये येतो किंवा निडेबन ग्रामपंचायत हद्दीमध्ये येतो याबद्दल मी खात्री केली होती. साक्षीदार सांगतो की, त्यावेळी तो निडेबन मध्ये वादातीत होता. सदरील वाद हा ग्रामपंचायत निडेबन व उदगीर नगर परीषद मध्ये होता. मी त्याबाबतचे कागदपत्र पाहिले नाही. ती माहिती मला ऐकीव आहे. मी ज्यांच्याकडुन प्लॉट घेतला त्यांचे नाव निडेबन ग्रामपंचायत अभिलेखावर नमुद होते. प्लॉट घेत असताना मी वर्तमान पत्रात जाहिरप्रगटन दिले नव्हते. मी पुर्व मालकाच्या नावे हास्तांतरण झाले बाबत ग्रामपंचायत मधील नामांतर पत्र पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरील प्लॉट निडेबनच्या हद्दीत नव्हता. निडेबन ग्रामपंचायत कार्यालयाकडुन बांधकामाठी परवानगी मिळण्याकरीता मी अर्ज केला होता. परंतु परवानगी मिळाली नाही. मी सदरील

प्लॉटवर नळ व विद्युत जोडणी घेतली नाही.

६. भारतीबाई हिने शेख मुबशीरोद्दीन यास प्लॉट विक्री केल्याचे सन २०११ साली मला कळाले होते. मला माहिती नाही की, सदरील प्लॉट भारतीबाई यांच्या नावे नगर परीषद यांच्या अभिलेखावर होता किंवा कसे. शेख मुबशीरोद्दीन यांच्या नावे प्लॉट झाले बाबत मी त्याचे अपिल केले नाही. वादग्रस्त प्लॉट वर शेख यांचे पत्र्याचे बांधकाम आहे किंवा कसे मला माहिती नाही. मी प्लॉट घेण्याआधी विधीज्ञांमार्फत सर्चरीपोर्ट काढला नव्हता. प्रतिवादी क्रमांक २ काय व्यवसाय करतात हे मला माहिती नाही. त्यांच्या नावे झालेले नमुद क्रमांक ८ चा उतार मी पाहिला आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त प्लॉट वर माझा ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा बैनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बैनाम्यामध्ये चुकीच्या चतुःसिमा दर्शवलेल्या आहेत. प्रतिवादी शेख हे माझ्या अंगावर धावून आले व माझ्या ताब्यात आडथळा केला. त्याबाबत मी पोलीस स्टशेनमध्ये अर्ज दिले होते. अभिलेखावर मी ते दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.03.12 18:12:52 +0530

**( एन.जे.चव्हाण )**
३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
उदगीर

दिनांक :– १२/०३/२०२५